Vol 7 Issue 3 Dec 2017

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER - 2017

# "उत्तर हिंदुस्थानी संगीतातील निवडक मराठी ग्रंथकारांचे सांगीतिक योगदान "

डॉ. संरिता इंगळे
संगीत विभाग प्रमुख , स्व.सी.एम.कढी कला महाविद्यालय,
परतवाडा, ता. अचलपूर, जि.अमरावती .

**सारांश–**
अनेक दिग्गज कलावंत होवून गेले की ज्यांची भूमीका ही पडदयाआड राहिली आणि तेही काळाच्या पडदयाआड गेले परंतु स्वकतृत्वाने ते आजही अजरामर आहेत हे निर्वीवाद सत्य आहे. अशा ग्रंथकारांच्या जीवनवृत्तांताविषयी आणि योगदानाची माहिती आपल्याला असणे आवश्यक आहे. यामध्ये प्रा. बी.आर. देवधर , पं. बाळकृबुवा इचलकरंजीकर, पं. विनयकराव पटवर्धन, पं. नारायण मोरेश्वर खरे, पं. विष्णू नारायण भातखंडे व अशाप्रकारे इतर अनेक कलावंतांचा समावेश आहे.

**बीजशब्द–** ग्रंथकार, संगीतकार, शास्त्रकार, नायक–गायक, रचनाकार.

**प्रस्तावना–**

साहित्य संगीत कला विहिनः।
साक्षात पशुपुच्छ विषाण हीनः।

"परंपरा आणि नवता" हया संबंधी अतिशय स्वच्छ दृष्टी ठेवून संगीताच्या विकासासाठी प्रयत्न करणारी जी काही माणसे होवून गेली. त्यांचे भारतीय संगीताच्या जडणघडणीत अतिशय महत्वाचे योगदान लाभलेले आहेत.

संगीताच्या सृष्टीतल्या हया कुशल कलावंतांचे दर्शन घडवितांना त्यांनी स्वतःकडे विनम्र विदयार्थ्यांची भूमिका घेतलेली आहे. कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करीत असतांना त्या विषयाचे शास्त्र जाणून घेणे महत्वाचे असते. त्यासाठी अभ्यासकाला ग्रंथांची आवश्यकता भासते. शास्त्रकारांनी लिहलेल्या ग्रथांतून अभिजात भारतीय संगीत टिकवून ठेवण्याचे कार्य या ग्रंथकारांनी केलेले आहे.

प्रस्तूत अध्ययनात त्यांचे जीवनवृत्तांत थोडक्यात सांगीतले आहेत. यापैकी बहुतांश ग्रंथकार हे एकोणविसाव्या शतकात जन्माला आलेले आहेत. त्यामुळे त्या संगीकारांच्या चरित्र्यांच्या निमित्ताने एका फार निराळया अशा कालखंडाचा सांस्कृतीक आणि सामाजिक इतिहास हया प्रकल्पातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.



भारतीय संगीताची निर्मीती ही खूप प्राचीन आहे. भारतीय संगीताला फार मोठा इतिहास, परंपरा लाभलेली आहे. सृष्टीच्या सुवर्णमय प्रारंभापासून प्रलयकारी अंतापर्यंत संगीताचे महत्व इतिहासाच्या प्रत्येक पानावर विद्यमान राहणार आहे.

संगीताच्या उगमापासून ते आधुनिक युगापर्यंत भरतमुनीचे नाटयशास्त्र ( इ.स. पूर्वी 200 ते 400) पासून तर आमच्या आधुनिक काळापर्यंत अनेक संगीततज्ञ, वाग्गेयकार, कवी, कलावंत इत्यादिनी संगीत कलेच्या इतिहासात अतुलनीय सांगीतिक कार्याने आपला ठसा उमटविला आहे. अभिजात भारतीय संगीत टिकवून ठेवण्याचे कार्य हया ग्रंथकारांनी केलेले आहे. उत्तर हिंदुस्थानी संगीतातील या निवडक मराठी ग्रंथकारांच्या सांगीतिक योगदानामध्ये पं. विनायकराव पटवर्धन, पं. नारायण मोरेश्वर खरे, पं. वि.ना. भातखंडे, श्री. बी.आर. देवधर, पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, डॉ. प्रभा अत्रे, श्री. नारायण मंगरुळकर अशी अनेक दिग्गज कलावंत दिसून येतात. यांचे सांगीतिक जीवनवृत्तांत थोडक्यात खालील प्रमाणे सांगता येतील.

*पं. विनायक पटवर्धन–*

पं. विनायकराव पटवर्धन हे पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे पट्टशिष्य आहेत. सुरुवातीचे शिक्षण त्यांनी त्यांचे काका श्री. केशवराव यांचे कडून घेतले व त्यानंतर वयाच्या 6 व्या वर्षापासून पं. विष्णू दिगंबर पलुस्करांकडे त्यांनी संगीत शिक्षण घ्यायला सुरुवात केली. पुढे स्वतःच्या मेहनतीने, श्रमाने ते फार विद्वान झाले, त्यांची फार मोठी ग्रंथसंपदा होती. त्यात "राग–विज्ञान " ग्रंथ प्रमुख आहे. श्री पटवर्धनांना "तराणा " म्हणण्यात हातखंडा होता. भारतीय संगीताचा प्रचार–प्रसार देशातच नव्हे तर परदेशातही त्यांनी केला.

*पं. नारायण मोरेश्वर खरे–*

पं. नारायण खरे हे पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक होते. श्री मोरेश्वर खरे म्हणजे त्यांचे वडील हे प्रख्यात गायक असून त्यांच्या आईकडूनही त्यांना आनुवंशिक संस्कार मिळाले होते. त्यानुसारच त्यांचा कंठ मधूर स्वरमयी होता. त्यांनी इलाहाबादमध्ये 400 भजनांचा संग्रह "आश्रम भजनावली " या नावाने प्रकाशित केला. गुजरातमध्ये संगीताचा भरपूर प्रचार–प्रसार केला. अहमदाबाद येथे 1912 मध्ये "संगीत मंडल " ची स्थापणा केली, अशाप्रकारे उत्तर हिंदुस्थानी संगीताच्या जडणघडणीत मराठी सांगीतिक ग्रंथकारांनी भारतीय संगीतास योगदान दिले.

*पं. विष्णू नारायण भातखंडे–*

सुर्यप्रकाशासमान तेजोमय, तेजस्वी पं. विष्णूनारायण भातखंडे. संगीत शास्त्राची कास धरुन संपूर्ण आयुष्यच जणू संगीताला अर्पण केलेले संगीत सृष्टीतील भगीरथ. भारतीय संगीत क्षेत्रातील हे थोर संगीत संशोधक होते. सुमारे 15 वर्षे चारही दिशेला भारतभर भ्रमण करुन "लक्ष्य संगीत " व "आधुनिक संगीत " हे शास्त्र ग्रंथ लिहले. संगीत शास्त्राची आगळी वेगळी परंतु सुलभ लिपी व इतर सुलभ पध्दती निर्माण केल्या व म्हणूनच त्यांना भारतीय संगीत क्षेत्रातील क्रांतीकारी युगपुरुष व व्याक्रणकार असे संबोधले गेले.

अष्टोतर शतके ताल, लक्षण आणि स्वरामुलाधार ही पुस्तके पंडीतजींनी 1911 मध्ये प्रसिध्द केलीत. 1912 मध्ये "संगीत पारिजात प्रवेशिका" व "रागविबोध" ग्रंथ प्रकाशित केले तसेच सदागचंद्रोदय, अभिनव राग मंजिरी, रागलक्षण, रागमाला, रागनिरुपण आदि ग्रंथ लिहलेत. ते गायक– नायक–शास्त्रकार–वाग्येयकार व संकलन कर्ते देखील होते. अशा पध्दतीने पंडीतजीचे भारतीय संगीतास योगदान लाभले.

*प्रा.बी.आर. देवधर–*

श्री. देवधर एक उत्तम गायक, अध्यापक, लेखक, रचनाकार असून त्यांचे व्यक्तीमत्व म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्वच. हे अतिशय सालस, आध्यात्मिक, परिश्रमी, लोकसंग्रही, नम्र. 1948 साली गंधर्व मंडळाच्या "संगीत कला विहार" या मासिकेचे त्यांनी संपादकत्व केले. तेव्हापासून त्यांनी अनेक लेख लिखाण सुरु केले. 1948 ते 1957–58 पर्यंत जवळजवळ 70–80 व्यक्ती चरित्र्य देवधरांनी लिहतील. त्यांनी लिहलेली ग्रंथसंपदा विस्तृत होती. नोव्हेंबर 1973 साली त्यांनी "थोर संगीतकार– भाग 1" व "थोर संगीतकार – भाग 2" हे ग्रंथ प्रकाशित केले. यामध्ये प्रकाशक श्री. रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन मुंबई असे रसायन होते. तर हयाच ग्रंथाची दूसरी आवृत्ती 1999 ला प्रकाशित झाली. प्रा. देवधरांची इतर प्रकाशने म्हणजे "आवाज साधनाशास्त्र" ;टवपबम ब्नसजनततम द्धए "रागबोध भाग 1 ते 5", "पं. वि.दि. पलुस्कर (चरित्र)"

*पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर–*

भारतीय शास्त्रीय संगीतातील ग्वाल्हेर घराणे म्हणजे सर्व घराण्याचे उगमस्थान मानले गेले आहे. या घराण्याच्या गायकीचा प्रचार व प्रसार महाराष्ट्रात सर्वप्रथम करणारे आदय गायनाचार्य म्हणून पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे नाव मोठया अभिमानाने घेतले जाते. त्यांचे गुरु पं. वासुदेवबुवा जोशी यांच्याकडूनही त्यांनी कला आत्मसात करुन त्यांचे शिष्य पं. विष्णू दिगंबर पलुस्कर या जेष्ठ शिष्याच्या द्वारे संपूर्ण महाराष्ट्रात संगीत कलेचा विशेषतः ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीचा प्रचार–प्रसार केला.

पुढे कोल्हापूरजवळ मिरज या गावी श्री. वी.रा. काळे यांच्या मदतीने "संगीत दर्पण" नावाचे मासिक प्रकाशीत केले. महाराष्ट्रात संगीताचा सर्वप्रथम प्रसार करण्यासाठी त्यांनी मुंबईत गायन समाजाची स्थापना केली. इचलकरंजीकर यांनी शास्त्रीय संगीताला समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली.

*स्वरयोगीनी डॉ. प्रभा अत्रे–*

स्वर अनुशासनप्रिय व्यक्तीमत्व, किराणा घरण्याचया गायिका म्हणून प्रसिध्द, उत्तम गायिका, उत्तम संशोधिकर्ता, बंदिशी रचनाकार व लेखिका. शालेय शिक्षणात एल.एल.बी., S.N.D.T. मुंबई येथे संगीत विभाग प्रमुख, सर्व गुणवत्तापूर्ण, निपूण असलेल्या डॉ. प्रभा अत्रे हया ख्याल, ठुमरी, दादरा, तराणा, गझल, भजन गायकीत निष्णात होत्या. डॉ. प्रभा अत्रे यांचे मराठीतील पहिले पुस्तक "स्वरमयी" असून त्यात संगीतावर आधारित निबंध व लेख आहेत. हया पुस्तकाला महाराष्ट्र राज्यशासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. "स्वरमयी " प्रमाणेच "सुस्वराली " (1992) या दूसऱ्या पुस्तकाला संगीत जगतातील व इतरही लोकांचा भरभरुन प्रतिसाद मिळाला.

संगीत क्षेत्रामधील त्यांचे गुरु म्हणजे श्री. सुरेशबाबु माने व श्रीमती हिराबाई बडोदेकर हे होत. त्यांनी कथ्थक नृत्याचेही औपचारीक प्रशिक्षण घेतले. आज त्यांची स्वतःची शिष्यमंडळी गायनात निष्णात झालेली आहेत. अशा स्वरमधूर विदुषीला गायक, रचनाकार अश्या इतरही बहुआयामी व्यक्तीत्वाने गौरवांकीत केले गेले कारण त्यांचे भरपूर योगदान भारतीय संगीतास लाभलेले आहे.

### डॉ. नारायण गोविंदराव मंगरुळकर–

श्री नारायणराव हे संगीतातील मर्मज्ञ, स्वरसाधक, अध्यापक, उत्तम गायक, गुरु, समीक्षक, लेखक, रचनाकार असे बहुआयामी व्यक्तीमत्व असलेले सत्पुरुष आहेत. हयांनी स्वगृही ""स्वरसंपदा" केंद्र स्थापन करुन अविरत विदयादानाचे कार्य केले. लेखन कार्य नेटाने करण्याचा त्यांचा छंद आहे. "वैदर्भिय संगीतोपासक भाग–1(1974), भाग –2"(1976), "संगीतशास्त्र विजयिनी" (1989) मध्ये लिहून प्रकाशित केली.

संगीतास वाहिलेली "स्वरसंपदा वार्षिकांक" 1978–1979–1980 अशी तीन वर्षे प्रकाशीत केली. पुढे "संगीतातील घराणी आणि चरित्रे" हे अतिशय उपयुक्त पुस्तक प्रकाशित झाले. नारायणरावांच्या पुस्तक संग्रहाचा लाभ संगीत रसिकांना महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतभर होवू लागला. सांगायचे विशेष असे की केवळ प्राप्त माहितीवर विसंबून न राहता स्वतःच्या स्वतंत्र बुध्दीचा वापर करुन सत्य तेच प्रकाशात आणण्याचा प्रमाणिक प्रयत्न त्यांनी केला आहे.

### समारोप–

शास्त्रीय संगीत हे प्राचीन अभिजात संगीत आहे. भारतीय संस्कृतीमध्ये संगीता प्रती फार मोठी ऐतिहासीक परंपरा लाभली आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दती अस्तित्वात होती की जिथे गुरुगृही जावून किंवा तिथेच वास्तव्याला राहून शिष्याला संगीत शिक्षण ध्यावे लागत असे व त्याअनुषंगाने त्या शिष्यावर संगीताचे संस्कार गुरुकडून प्राप्त होत असत. यावेळी संगीत शिक्षण हे मौखीक स्वरुपांचे होते.कालांतराने स्वरलिपींचे लिखाण होवू लागले व त्याहीपुढे अनेक तंत्रज्ञानाच्या वापराने संगीत प्रचार – प्रसाराचे माध्यम वाढून संगीत शिक्षा आत्मसात करता येवू लागली.

अशाप्रकारे भारतीय ग्रंथकारांमधील मराठी ग्रंथकारांनी विविध सांगीतिक विषयानुरुप विविध ग्रंथे लिहलीत त्यामुळे त्याचा फायदा भारतीय संगीत रसिकांना होवून राष्ट्रीय एकात्मता साधल्या गेली हे निश्चित.

### संदर्भ ग्रंथ सूची

1. प्रा. देवधर बी. आर., "थोर संगीतकार", अ.भा.गां.म. मंडळ मुंबई.
2. देशपांडे वा.ह., "घरंदाज गायकी."
3. सौ. मंगरुळकर विजया, "स्वरसंपदा वार्षीकांक", स्वरसंपदा केंद्र नागपूर
4.डॉ. मंगरुळकर नारायण, "संगीतशास्त्र विजयिनी", स्वरसंपदा केंद्र नागपूर
5. श्री. जगताप समीर, "संगीत विशारद", मधुराज पब्लीकेशन पुणे.
6. दासगुप्ता लिपीक, "भारतीय संगीतशास्त्र परंपरा", कला प्रकाशन अमरवती
7. डॉ.सौ. मेहरे माणीक, "भारतीय संगीतशास्त्र", राघवन डिस्ट्रीब्युटर नागपूर
8. Dr. Prabha Arte,wikipedia 02/12/2017



*डॉ. संरिता इंगळे*
*संगीत विभाग प्रमुख , स्व.सी.एम.कढी कला महाविद्यालय,परतवाडा, ता. अचलपूर, जि.अमरावती .*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* Directory Of Research Journal Indexing
* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com